(पुरूषोत्तम वि. गोविंद)

**वादीतर्फे सा.क्र. २ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. डी. काकाणी यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ८५ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

२. मी शपथपत्रासह खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

1) वादी यांचा प्रवरा सह. बँक लि. लोणी येथील कर्ज मागणी व कर्ज मंजूरी अर्ज **नि.क्र. ८६**.
2) वादी यांचा प्रवरा सह. बँक लि. लोणी येथील कर्ज खाते उता–याची प्रमाणित प्रत **नि.क्र. ८७**.
3) ६५ बी प्रमाणपत्र **नि.क्र. ८८**.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. बी. शेळके यांच्यामार्फत :-**

३. मी प्रवरा सह बँक लि., शाखा-सोनगाव येथे गेल्या सहा महिन्यापासून शाखा प्रबंधक म्हणून कार्यरत आहे. वादीचे कर्ज मंजूरीचे प्रकरण माझ्या काळात झालेले नाही. मला त्याबद्दल वैयक्तिक माहिती नाही. वादीने कुठल्या नंबरसाठी कर्ज घेतले होते हे कागदपत्रावरून सांगता येईल. वादीने कर्ज मागणी अर्जामध्ये नमूद केलेल्या कारणांची तपासणी आमच्या बँकेने केली का याबद्दल मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी वादीच्या सांगण्यावरून खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.01.30 17:07:00 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-३०/०१/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.